प्रसिध्दीसाठी मसुदा


डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

**उद्यानविद्या महाविद्यालय,**

**दापोली, जि. रत्नागिरी**

E-mail : headhortkkv@rediffmail.com


जा. क्र. उविमदा/निर्लेखन/ /२०२२, दिनांकः—

# जाहिरात

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत उद्यानविद्या महाविद्यालय, दापोलीच्या फळे आणि भाजीपाला प्रक्रिया केंद्रातील भांडारातील निरूपयोगी जडवस्तू संग्रहचे निर्लेखन करण्यासाठी या जाहिरातीद्वारे निर्लेखन स्विकारण्यास इच्छूक दरपत्रक धारकांकडून मोहरबंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर लिलावात निर्लेखीत करवायाच्या जडवस्तू या कार्यालयीन वेळेत उद्यानविद्या महाविद्यालयाच्या प्रक्षेत्र क्र. ४ येथे दिनांक ०२/११/२०२२ ते १३/११/२०२२ पर्यंत कार्यालयीन सुटटीचे दिवस वगळून पहावयास मिळतील. तसेच लिलावात भाग घेणाऱ्या इच्छूक व्यक्तीनी निरूपयोगी जडवस्तू विक्रीबाबतच्या अटी शर्ती व दरपत्रक भरण्याचे विहित नमुन्यातील अर्ज रोखीने रक्कम रू. १००/— (रू. शंभर मात्र) भरून उपलब्ध होतील. सदर अर्ज दिनांक ३१/१०/२०२२ ते १५/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. तसेच बंद लखोटयातील दरपत्रके दिनांक १६/११/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत प्रमुख तथा सहयोगी अधिष्ठता, उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांचे नावे या कार्यालयात सादर करावीत. प्राप्त दरपत्रके त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता समिती आणि निविदाधारक यांच्या समोर उघडण्यात येतील.

## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
## उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली

### निरुपयोगी जडवस्तू लिलावाबाबतच्या अटी व शर्ती

१. निरुपयोगी जडवस्तू विक्रिबाबतच्या अटी व दरपत्रक भरण्याचे विहित नमुन्यातील फॉर्म रोखीने रु. १००/— (रु. शंभर मात्र) भरुन उद्यानविद्या महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी या कार्यालयात सुटटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील. दरपत्रकासोबत दरपत्रक भरणाऱ्यांनी अनामत रक्कम म्हणून रु. १५०००/— (रु. पंधरा हजार मात्र) एवढी रक्कम रोखीने भरावयाची आहे व तशी रक्कम भरल्याची पावती दरपत्रकाच्या लखोटयासोबत जोडणे बंधनकारक आहे.

२. विक्रि करावयाच्या जडवस्तू कार्यालयीन वेळेत जेथे आहे जसे आहे तसे दिनांक ०२/११/२०२२ ते १३/११/२०२२ या कालावधीत प्रत्यक्ष पाहणीस उपलब्ध राहतील.

३. दरपत्रकधारकाने दरपत्रकात दर्शविलेल्या किमती शिवाय इतर काही कर असल्यास ते संबंधित दरपत्रकधारकानेच भरावयाचे आहेत.

४. विक्रि करावयाच्या एकूण १७३ जडवस्तू (मुख्य भांडार नर्सरी नं. — ४, १० — ८० नग, हायटेक — २६ नग, आंबा गुणवत्ता केंद्र, — ३३, प्रयोगशाळा — २८ नग व फळे आणि भाजी प्रक्रिया केंद्र — ०६ नग) आहेत.

५. दरपत्रक सादर करताना दरपत्रकधारकाने घातलेली कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

६. सिलबंद दरपत्रकाच्या पाकीटावर 'निरुपयोगी जडवस्तू साठी दरपत्रक' असे नमुद करावे. त्याखाली या कार्यालयाचा पत्ता असावा. पाकीटाच्या मागच्या बाजूस दरपत्रकधारकांचे सुपूर्ण नाव, पत्ता व मोबाईल क्रमांक लिहावा.

७. दरपत्रके दि. १६.११.२०२२ रोजी १२.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील

८. मोहोरबंद दरपत्रकांद्वारे वाजवी/अपेक्षित किंमत न आल्यास दरपत्रक उघडल्यानंतर लगेच उपस्थित दरपत्रक धारकासमोर वस्तूची विक्रि करण्याच्या हक्क या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

९. एक किंवा सर्वच दरपत्रके तसेच तोंडी बोली कोणतेही कारण न देता ना मंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

१०. आवश्यकता भासल्यास तोंडी बोलीद्वारे लिलाव करण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवला आहे.

११.दरपत्रके उघडल्यानंतर गटनिहाय पहिल्या तीन क्रमांकाच्या दरपत्रकधारकांची अनामत रक्कम राखून ठेवून इतरांच्या रक्कमा त्वरीत परत करण्यात येतील तसेच उरलेल्या अनामत रक्कम विक्रि प्रक्रिया पूर्ण झाल्यावर परत करण्यात येतील.

१२. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर जडवस्तूची खरेदी नाकारल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१३. स्वीकृत दरपत्रकात नमुद केलेली रक्कम लिलावा दिवशी वस्तू ताब्यात घेण्यापूर्वी रोखीने भरावी.

१४. ज्या लिलावधारकाचे दरपत्रक मंजूर झाले आहे त्यांनी लिलावाची रक्कम २४ तासाच्या आत कार्यालयात भरणे बंधनकारक आहे.

१५. मंजूर दरपत्रकधारकाने खरेदी केलेल्या जडवस्तू चार दिवसाच्या आत प्रक्षेत्रावरुन संबंधीत अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली स्वखर्चाने कार्यालयीन वेळेत घेऊन जाणे बंधनकारक आहे.

**प्रमुख तथा सहयोगी अधिष्ठाता,**